सकाळ

# डॉ. आप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमाला एक मार्चपासून



**आप्पासाहेब पवार**

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र व इतिहास अधिविभागातर्फे डॉ. आप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमाला १ व २ मार्चला होत आहे. इतिहास अधिविभागाच्या सभागृहात दुपारी बारा वाजता त्यास सुरुवात होईल. फुले पुणे विद्यापीठातील डॉ. सी. आर. दास यांना निमंत्रित केले असून, ते मराठा इतिहासलेखन पद्धतीचे नवे आयाम, अठराव्या शतकातील मराठेशाही : साम्राज्य आणि राजकारण, ओडिशा प्रांतातील मराठा राजकारण : १७५१-१८०३ विषयावर व्याख्याने देतील. व्याख्यानमालेसाठी इतिहासप्रेमी यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. नीलांबरी जगताप यांनी केले आहे.

Kolhapur, Main
26/02/2019 Page No. 5

26 FEB 2019

सकाळ



# विद्यापीठात उद्या विज्ञान प्रदर्शन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजीतर्फे राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून बुधवारी (ता. २७) लोककला केंद्र येथे विज्ञान प्रदर्शन होत आहे. या दिवशी विद्यापीठातील सर्व प्रयोगशाळा विज्ञानप्रेमी नागरिकांसाठी खुल्या ठेवल्या जाणार आहेत. विज्ञान प्रदर्शन व विद्यापीठातील प्रयोगशाळेस भेट द्यावी, असे आवाहन स्कूल ऑफ नॅनोसायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजीचे समन्वयक प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी केले आहे.

26 FEB 2019

सकाळ

# मराठी भाषा गौरव दिनानिमित्त उद्या कार्यक्रम

कोल्हापूर, ता. २५ : राज्य शासन व शिवाजी विद्यापीठातर्फे बुधवारी (ता. २७) मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'बोलू कवतिके' विशेष सांस्कृतिक कार्यक्रम होत आहे. वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात सायंकाळी सहा वाजता त्यास सुरुवात होईल, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली आहे.

मोहन पारसनीस व ओंकार भिसे निर्मित 'बोलू कवतिके' हा मराठी भाषेचे महत्त्व सांगणारा कार्यक्रम होईल. दुपारी १ वाजता विभागातर्फे ग. दि. माडगूळकर जन्मशताब्दीनिमित्त 'राम जोशी' हा चित्रपट दाखविण्यात येईल. तसेच २८ फेब्रुवारीला 'म्हणींतले समाजदर्शन : पश्चिम महाराष्ट्रातील म्हणी विशेष' विषयावर विद्यार्थी सादरीकरण करतील. अवतांबर शिरढोणकर व त्यांचे सहकारी १ मार्चला दुपारी १२ वाजता 'रंग लोककलेचे' हा विशेष कार्यक्रम सादर करतील.

# उद्या डॉ. गोविलकर यांचे व्याख्यान

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ व कोल्हापूरमधील प्रमुख औद्योगिक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार (दि. २७) रोजी सायंकाळी ५ वाजता राजर्षी शाहू सभागृह (सिनेट हॉल) येथे 'स्वतंत्र भारताचा आर्थिक विकास' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. अर्थतज्ज्ञ, राज्य नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. विनायक गोविलकर व्याख्यान देणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असतील. तरी कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# विद्यापीठ तंत्रज्ञान विभागात माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागात माजी विद्यार्थ्यांचा मेळावा उत्साहात झाला. विभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी माजी विद्यार्थ्यांनी अधिविभागातील आठवणींना उजाळा देऊन अधिविभागाचे जीवनातील योगदानाविषयी विचार मांडले. विभागातील विद्यार्थ्यांना भविष्यातील वाटचालीबाबत मार्गदर्शन व सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. सूत्रसंचालन प्रा. एम. एम. वाघ यांनी केले. फूड टेक्नॉलॉजी विभागाचे समन्वयक डॉ. ए. के. साहू यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 FEB 2019
पुढारी

# मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

## 'बोलू कवतिके' विशेष सांस्कृतिक कार्यक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राज्य शासन व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. २७) मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात येणार आहे. बुधवारी सायंकाळी ६ वाजता विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात 'बोलू कवतिके' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ज्येष्ठ साहित्यिक वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात येतो. याचे औचित्य साधून शासनातर्फे विविध कार्यक्रम व उपक्रम राबविले जाणार आहेत. मराठी अधिविभागातर्फे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त दि. २७ रोजी सकाळी ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. त्यानंतर ११.३० वाजता 'महाराष्ट्राची कीर्तन परंपरा' या विषयावर ह.भ.प. कुंडलिक पाटील यांचे व्याख्यान होणार आहे. दुपारी १ वाजता विभागातर्फे ग. दि. माडगूळकर जन्मशताब्दीच्या निमित्ताने 'राम जोशी' हा चित्रपट दाखविण्यात येणार आहे. दि. २८ रोजी सकाळी 'म्हणींतले समाजदर्शन : पश्चिम महाराष्ट्रातील म्हणी विशेष' या विषयावर विद्यार्थी सादरीकरण करतील. प्रमुख पाहुणे म्हणून जयसिंगपूरचे डॉ. मोहन पाटील उपस्थित राहणार आहेत. दि. १ मार्च रोजी दुपारी १२ वाजता 'रंग लोककलेचे' हा विशेष कार्यक्रम अवतांबर शिरढोणकर आणि त्यांचे सहकारी सादर करतील. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

# शिवाजी विद्यापीठात उद्या विज्ञान प्रदर्शन

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागातर्फे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त बुधवारी (दि. २७) लोककला केंद्र येथे विज्ञान प्रदर्शन भरविण्यात आले आहे. दि. २३ ते २८ या कालावधीत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. याचा लाभ घेण्याचे आवाहन स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजीचे समन्वयक प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 FEB 2019
सकाळ

# भौतिक सुखासाठी पर्यावरण हानी विघातक

## श्रीराम पवार; शिवाजी विद्यापीठात गांधी अध्यासन केंद्रातर्फे राष्ट्रीय चर्चासत्र

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २५ : भौतिक सुखासाठी पर्यावरणाची हानी करणे विघातक आहे, असे प्रतिपादन सकाळ माध्यम समूहाचे संपादक संचालक श्रीराम पवार यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठातील गांधी अध्यासन केंद्रातर्फे आयोजित 'महात्मा गांधींचा पर्यावरणवाद : सद्यकालीन पर्यावरणवादी चळवळी' विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. मानवशास्त्र सभागृहात चर्चासत्राचे आयोजन केले आहे.

श्री. पवार म्हणाले, ''अमेरिकेने भौतिक प्रगती पर्यावरणाची लूट न करता केली आहे. अमेरिकेसारखी



प्रगती संपूर्ण मानव जातीने करायचे ठरवले तर दहा पृथ्वी कमी पडतील, अशी स्थिती निर्माण होईल. त्यामुळे पर्यावरणाचा विचार करून प्रगती कशी साधता येईल, याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.''

ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर म्हणाले, ''महात्मा गांधी यांचा पर्यावरणवादाचा विचार हा व्यवस्था परिवर्तनाचा आहे. हा विचार खोल परिसृष्टीवादी असून, तो केवळ पर्यावरणाच्या जतनाचा विचार नाही. आधुनिक भांडवली अर्थव्यवस्थेमुळे पर्यावरणाच्या ऱ्हासाला प्रारंभ झाला. ती अर्थव्यवस्था नाकारून चिरस्थायी अशी अहिंसेवर आधारित पर्यायी ग्रामीण अर्थव्यवस्था गांधीजींनी स्वीकारली.''

पाश्चात्य विचारवंतांनी जो उपयुक्ततावादाचा शब्दात मांडला. त्यामुळे मनुष्याची आनंदाची संकल्पनाच बदलली. आधुनिकता हीच पर्यावरणाच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरली. महात्मा गांधी यांनी हिंद स्वराज या पुस्तिकेत याबाबतची भूमिका मांडली आहे. पर्यावरण अभ्यासक उदय गायकवाड यांनी 'सकाळ'ने विविध उपक्रमांतून पर्यावरण बचावाचा कसा संदेश दिला आहे, याबद्दल माहिती देत 'सकाळ'च्या उपक्रमांचे कौतुक केले. डॉ. विवेक कोरडे व संदीप बर्वे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. सुचेता सुरगिहळ्ळी यांनी चर्चासत्रामागील भूमिका स्पष्ट केली. डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले.

## सोबती, वर्मा, नामवरसिंह यांना अभिवादन

कोल्हापूर : ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त कृष्णा सोबती, निराला साहित्य समीक्षक अर्चना वर्मा व नामवरसिंह यांना शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागात श्रद्धांजली वाहून अभिवादन करण्यात आले. हिंदी विभागप्रमुख, अभ्यागत, संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 FEB 2019
तरुण भारत

# डॉ. नामवर सिंह, डॉ. रोहिताश्व यांना आदरांजली

**कोल्हापूर :** हिंदीतील साहित्यिक डॉ. नामवर सिंह, डॉ. रोहिताश्व यांना महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणेच्या कोल्हापूर शाखेने रविवारी आयोजित कार्यक्रमात आदरांजली वाहिली. याच कार्यक्रमात सिंह आणि डॉ. रोहिताश्व यांच्या साहित्यावर विचारमंथन झाले.

महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेचे कोल्हापुरात बिनखांबी गणेश मंदिर परिसरात कार्यालय आहे. दिल्ली येथील डॉ. नामवर सिंह यांचे कोल्हापूरशी घनिष्ठ संबंध होते. शिवाजी विद्यापीठात घेण्यात आलेल्या हिंदीच्या विविध चर्चासत्रातही ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कोल्हापुरात आल्यावर ते पन्हाळ्यालाही जायचे. हिंदीतील पहिले ज्ञानपीठ विजेते साहित्यिक सुमित्रानंदन पंत यांचे जन्मशताब्दी वर्ष २००१ मध्ये होते. तेव्हा शिवाजी विद्यापीठात या जन्मशताब्दी वर्षांच्या कार्यक्रमाला डॉ. नामवर सिंह प्रमुख पाहुणे उपस्थित होते. त्यांचे दिल्ली येथे नुकतेच निधन झाले. गोवा विद्यापीठातील हिंदी विभागप्रमुख डॉ. रोहिताश्व उर्फ बी. के. बालकृष्ण शर्मा यांचेही नुकतेच निधन झाले. डॉ. नामवर सिंह, डॉ. रोहिताश्व या दोघांना हिंदी प्रचार सभेच्या कार्यालयात श्रद्धांजली वाहण्यात आली.

शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागातील डॉ. अर्जुन चव्हाण यांनी डॉ. सिंह यांच्या प्रतिमेचे पूजन केले. त्यानंतर डॉ. सिंह, डॉ. रोहिताश्व यांच्या हिंदी साहित्यातील योगदानावर डॉ. चंद्रकला चव्हाण, प्रा. संपत जाधव, प्रा. अशोक मरळे, विलास शेंडगे, डॉ. आर. व्ही. भुयेकर आदींनी विचार मांडले. हिंदी प्रसार केंद्राचे प्रमुख डॉ. नारायण केसरकर यांनी स्वागत करून आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 FEB 2019
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात आयोजित माजी विद्यार्थी मेळाव्यात बोलताना तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी.

# तंत्रज्ञान अधिविभागात माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

कोल्हापूर : उच्च ज्ञान व त्यातून आलेली पात्रता याचा उपयोग व्यक्ती आणि समाजात बदल घडविण्यासाठी व्हावा, अशी अपेक्षा तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनी व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात आयोजित माजी विद्यार्थी मेळाव्यात ते बोलत होते. डॉ. बागी म्हणाले, 'सध्याचे रोजगार मोठ्या प्रमाणावर कालबाह्य होत असताना नव्याने संधी निर्माण होतील, त्या कोणत्या असतील, याचा वेध शिक्षण क्षेत्र घेत असतेच.' माजी विद्यार्थ्यांनी अधिविभागातील आठवणींना उजाळा देऊन अधिविभागाचे आपल्या जीवनातील योगदान स्पष्ट केले. प्रा. एम. एम. वाघ यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. ए. के. साहू यांनी आभार मानले.

# 'अंनिस'च्या अध्यक्षपदी ककडे, कार्याध्यक्षपदी शेलार



ककडे



शेलार

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कोल्हापूर शहर अध्यक्षपदी प्रा. विजयकुमार ककडे यांची तर कार्याध्यक्षपदी अनिल शेलार यांची निवड करण्यात आली. ज्येष्ठ कार्यकर्ते धनाजीराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस कार्याध्यक्षा सीमा पाटील, सुजाता म्हेत्रे, रमेश वडणगेकर, सचिन ओतारी, गीता हासूरकर, कॉ. अनिल चव्हाण आदी उपस्थित होते. निवड समितीतील कार्यकारिणी सदस्य असे : जीवन बोडके, गौरी बेनाडीकर, स्वाती कृष्णात, नियाज अत्तार, ॲड. अजित चव्हाण, तेजश्री पाटील, सर्वेश सवाखंडे, किरण गवळी, यश अंबोळे, सुषमा सूर्यवंशी, मंगल पवार, निशांत शिंदे, अतिश कांबळे, क्षितीज बनसोडे, अरुणराव पाटील, पंकज खोत, कपिल मुळे, वैभव राऊत, धर्मराज कांबळे, मयुरी जगतकर, छकुताई देठे, पंडित ढवळे आदींचा समावेश आहे.

सकाळ

# ‘ऊर्जा’च्या मोफत सन्मानिकांना प्रतिसाद

## संजय घोडावत ग्रुप स्टार एअर प्रस्तुत संवाद मालिका

**कोल्हापूर, ता. २५ : ‘सकाळ माध्यम समूह’ आणि शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार (ता. २८)पासून सलग चार दिवस संजय घोडावत ग्रुप स्टार एअर प्रस्तुत ‘ऊर्जा- संवाद ध्येयवेड्यांशी’ हा अनोखा कार्यक्रम रंगणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात रोज सायंकाळी सहा ते रात्री आठ या वेळेत ही पर्वणी मिळणार असून, आजपासून ‘सकाळ’च्या शिवाजी उद्यमनगर येथील कार्यालयात मोफत सन्मानिका वितरणाला प्रारंभ झाला आहे.**

पहिल्याच दिवशी सन्मानिकांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. बुधवार (ता. २७) सायंकाळी पाच पर्यंतच सन्मानिका उपलब्ध असून सन्मानिका असलेल्यांनाच प्रथम प्राधान्य दिले जाणार आहे.

‘सकाळ’ने चार वर्षांपूर्वी या अनोख्या उपक्रमाला प्रारंभ केला आणि त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नववर्षाचा प्रारंभ आणि ‘सकाळ’चा ‘ऊर्जा’ हा उपक्रम हे आता एक समीकरणच झाले असून विविध क्षेत्रांतील यशोलौकिकाच्या शिलेदारांशी संवाद साधण्याची ही एक पर्वणी असते.

यापूर्वी बॉलिवूडचे प्रसिद्ध निर्माता सुभाष घई, प्रसिद्ध अभिनेते अतुल कुलकर्णी, बीव्हीजी इंडिया लिमिटेडचे हणमंतराव गायकवाड, गणितज्ज्ञ आनंद कुमार, प्रसिद्ध दिग्दर्शक मधुर भांडारकर, प्रसिद्ध उद्योजक राजेंद्र पटेल, ‘नाबार्ड’चे माजी अध्यक्ष यशवंतराव थोरात, विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील, ‘व्हेंटिलेटर’ चित्रपटाचे दिग्दर्शक राजेश मापुस्कर, अभिनेता श्रेयस तळपदे, रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेत्या नीलिमा मिश्रा आदींशी संवाद साधण्याची संधी मिळाली होती. यंदाही हीच परंपरा पुढे कायम राहणार आहे. असे होतील संवाद : २८ फेब्रुवारीला प्रसिद्ध अभिनेता सुबोध भावे, १ मार्चला सांगलीचे पोलिस अधीक्षक सुहैल शर्मा, २ मार्चला पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे, ३ मार्चला महिला उद्योजिका जयंती कठाळे यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळणार आहे. ‘ऊर्जा- संवाद ध्येयवेड्यांशी’ उपक्रमाला गेली पाच वर्षे शिवाजी विद्यापीठाचे विशेष सहकार्य मिळाले असून गर्दीच्या पार्श्वभूमीवर पार्किंगची नेटकी व्यवस्था असेल.

चला तर मग, आजच वेळेचे नियोजन करूया. २८ फेब्रुवारी ते ३ मार्चची सायंकाळ नवप्रेरणादायी करूया...!

### असे होतील संवाद

२८ फेब्रुवारी



सुबोध भावे

१ मार्च



सुहैल शर्मा

२ मार्च



डॉ. रवींद्र कोल्हे

३ मार्च



जयंती कठाळे

### प्रायोजक असे...

- टायटल स्पॉन्सर : संजय घोडावत ग्रुप स्टार एअर
- सहप्रायोजक : तनिष्क शोरूम, चाटे ग्रुप ऑफ एज्युकेशन, मार्व्हलस इंजिनिअर्स
- हॉस्पिटॅलिटी पार्टनर : हॉटेल सयाजी

**अधिक माहितीसाठी संपर्क : सूरज (९५५२५८१९१८), उत्तम (९६२३५३३५४७).**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 FEB 2019
Times of India

# Warake is new spl IG Kolhapur range

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** In a major shuffle of senior police officers in the state, Special Inspector General Vishwas Nangre Patil has been transferred to Nashik. **Suhas Warake** will be new special IG for Kolhapur range.

The state home department's order of February 20 says Nangre Patil has been transferred as Commissioner of Police, Nashik. Warake who is inspector general, ATS, Mumbai, has been transferred to Kolhapur range as special inspector general.

Nangre who took charge of Kolhapur range in July 2016, launched several measures to improve police functioning and regularise traffic flow in all districts of Kolhapur range. He had initiated action against criminal gangs under Maharashtra Control of Organised Crimes Act (MCOCA), and helped to maintain peace.

A novel project to prevent harassment of women was set up, and special teams called 'Nirbhaya' were dedicated to the work. The teams continue to function on the lines of the 'She Team' active in Hyderabad, Telangana. These teams are active in all districts of Kolhapur range and maintain data of those caught harassing women and the action taken against them. There are ten such teams, with each team comprising six police personnel.

**Warake who is inspector general, ATS, Mumbai, has been transferred to Kolhapur range as special inspector general**

